दै. सत्यप्रभा दि. 02.03.25

## जिथे माज केला तिथेच उतरवण्याचा प्रयत्न

# पोलिसांकडून गुन्हेगारांची वरात



नांदेड दि. १ : भाई होण्याच्या नादात गुन्हेगारांकडून दहशत निर्माण करण्याच्या प्रयत्न होत असल्याने शहरवासियांत भीतीचे वातावरण पसरले आहे. गल्लीतील याच दादा, भाईला अद्दल शिकवण्यासाठी नांदेड ग्रामीण पोलिसांकडून परेड काढण्यात आली आहे. त्यांना तंबी देण्यात आली आहे.

शहरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटना वाढल्या आहेत.घरफोडी, चाकू हल्ले ,दहशत पसरविणे यातून कायदा आणि सुव्यवस्थेवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड ग्रामीण पोलीसांनी शनिवारी दुपारी सिडको हडको भागातील मुख्य रस्त्याने अट्टल गुन्हेगार गणेश मोरे, संघरत्न वाघमारे, दिग्जविजय नारागुट्टा या आरोपींची धिंड काढली आहे. शहरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटना वाढल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर पोलिस निरीक्षक चिंचोळकर यांनी गुन्हेगारांची ओळख परेड,धिंड तसेच तंबी देत गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यात येत आहे.